# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 164/2024 दिनांक : 09.05.2024

## 1)खुनाचा प्रयत्न :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक 07.05.2024 रोजी 21.30 वा. चे सुमारास, **तंत्रनिकेतन चे पाठीमागे आसदवन शिवारात विष्णुपुरी नांदेड येथे**, यातील नमुद दोन आरोपीतांनी पोस्टे भाग्यनगर हद्दीत अग्निशस्त्र फायरींग करून एका ईसमाचे बळजबरीने 40,000/- रूपये चोरून घेतले सदर आरोपीतांचा शोध घेणे करीता फिर्यादी व यांचे सोबतचे पोलीस अंमलदार यांना दोन संशयीत ईसम मिळुन आल्याने त्यांना पोलीसांची चाहुल लागताच ते पळत सुटले थांबण्याचा ईशारा केला असता ते थांबले नाहीत त्यांचे जवळील अग्निशस्त्र पोलीसांचे दिशेने रोकुन जिवे ठार मारण्याचे उद्देशाने एक गोळी झाडुन खुन करण्याचा प्रयत्न केला व शासकीय कामात अडथळा केला. वगैरे **फिर्यादी आनंद मारोती बिचेवार, वय 33 वर्षे, व्यवसाय स्थागुशा रा. नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 359/2024 कलम 307,353,34 भादवी सह कलम 3/25, 27 (2) भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री कांबळे, मो.क्रं. 9823031227** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :-

**शिवाजीनगर :-**दिनांक 03.05.2024 रोजी 16.30 वा. चे सुमारास, **एचआयजी कॉलनी, नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे पायी जात असताना यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून मोटारसायकल वर येवुन फिर्यादीस खंजरचा धाक दाखवुन खिशातील नगदी 10,000/-रूपये व एक मोबाईल फोन किंमती 10,000/- रूपयाचा असा एकुण किंमती 20,000/- रूपयेचा मुद्देमाल जबरीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सचिन गुणाजी कपाळे, वय 35 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. लक्ष्मीनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 159/2024 कलम 392,34 भादवी सह 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/सोनकांबळे, मो.नं. 9588685155** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक 05.05.2024 रोजी 13.00 ते 14.00 वा. चे दरम्यान, **शासकीय दवाखाना विष्णुपुरी, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची फॅशन प्रो कंपनीची मोटार सायकल क्रमांक एमएच-26/बीजे-3564 किंमती 20,000/-रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी सखाराम यादवराव यललकर, वय 42 वर्षे, व्यवसाय शेती रा. वैजापुर ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 363/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1271 सातारे, मो.क्रं. 9823024794** हे करीत आहेत.

## 4)पळवुन नेले :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक 06.05.2024 रोजी 12.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरासमोर बळीरामपुर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा **मुलगा नामे मारोती रामचंद्र वाघमारे, वय 16 वर्षे, रा. बळीरामपुर नांदेड** यास कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी पळवुन नेले आहे. वगैरे **फिर्यादी ज्योतीबाई रामचंद्र वाघमारे, वय 40 वर्षे, व्यवसाय घरकाम नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 360/2024 कलम 363 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जामोदकर, मो.क्र. 9923895077** हे करीत आहेत.

## 5)चोरीचा प्रयत्न :-

**हदगाव :-** दिनांक 01.05.2024 रोजी 06.00 वा. चे सुमारास, **सुभाष साखर कारखाना परिसरमध्ये हडसणी ता. हदगाव जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बैलगाडीचे जुने वापरते एक्सल व हब बेरिंग किंमती 50,000/-रूपयाचा माल एमएच-26/व्ही-7910 टॅक्टर मध्ये चोरून नेण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी गंगाधर संभाजी संगमवाड, वय 54 वर्षे, व्यवसाय नौकरी सुरक्षा अधिकारी सुभाष साखर कारखाना परिसरमध्ये हडसणी ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 125/2024 कलम 379,511 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2817 मुडिक, मो.क्रं. 7774032817** हे करीत आहेत.

## 6)अपघात :-

**तामसा :-** दिनांक 03.05.2024 रोजी 21.30 वा. चे सुमारास, **मौ. टाकराळा बु. हिमायतनगर ते भोकर जाणारे रोडवर ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे**, यातील **मयत नामे 1) खाज्यामिया हसन पठाण, वय 54 वर्षे, 2) सलमान शेख दावल वय 05 वर्ष रा. वडार गल्ली ता. हिमायतनगर जि. नांदेड** यास यातील नमुद आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल क्रमांक एमएच-26/बीआर-0012 ही हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन पाठीमागुन जोराची धडक देवुन यातील मयताचे मरणास कारणीभुत झाला वगैरे **फिर्यादी अनिसा बेगम दावल, वय 43 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. वडार गल्ली, तामसा ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरनं.41/2024 कलम 279,337,338,304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री डुडुळे मो.क्रं. 9822179877** हे करीत आहेत.

## 7)विवाहीतेचा छळ :–

**नायगाव :–** दिनांक 01.01.2023 ते दिनांक 31.05.2024 रोजी पावेतो, **मौ. गडगा फिर्यादीचे सासरी ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस ट्रॅक्टर खरेदी करण्यासाठी 5,00,000/–रूपये घेवुन ये म्हणुन वाद घालुन फिर्यादीबाईस शिवीगाळ करून मारहाण करून शारिरीक माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 29 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरनं 100/2024 कलम 498(अ), 323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/वाघमारे, मो.क्रं. 9096618241** हे करीत आहेत.

## 8)फसवणुक :–

**अर्धापुर :–** दिनांक 28.02.2023 ते 08.05.2024 चे दरम्यान, **कासारखेडा ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस त्यांचे घरचे लग्न असल्याने घर राहण्यासाठी मागितले असता त्यांनी बनावट व खोटे संमती पत्र तयार करून फिर्यादीचे मालकीची व ताब्यातील घर हे बनावट खोटे कागदपत्र तयार करून आपले नावावर करून घेवुन फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी मेहरूनिसा गफुरमिया, वय 60 वर्षे, रा. कासारखेडा ता. अर्धापूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं. 214/2024 कलम 420,463,464,468,471,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनी/श्री कदम, मो.नं. 7083552233** हे करीत आहेत.

## 9)जुगार :–

**मरखेल :–** दिनांक 08.05.2024 रोजी 12.50 वा. चे सुमारास, **मरखेल बसस्थानक येथे ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आारोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या श्रीदेवी नावाचा मटका जुगार खेळत व खेळवीत असतांना जुगाराचे साहित्य व नगदी 1780/–रूपयाचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोउनि/मारोती नारायण तेलंग, ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 90/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/शेख, मो.नं. 777606774** हे करीत आहेत.

## 10)प्रोव्हिबीशन :–

**मरखेल :–** दिनांक 08.05.2024 रोजी 20.40 वा. चे सुमारास, **मरखेल ते किणी जाणारे रोडवर. ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 20,160/–रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात मोटारसायकल किंमती 30,000/– रूपये असा एकुण किंमती 50,160/–रूपयाचा माल ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री संकेत वसंतराव दिघे, ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 91/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास तपास पोहेकॉ/शेख, मो.नं. 7776067774** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड